# 1. संच
# Extra Questions

**प्र. 1) खालील संच यादी पद्धतीने लिहा. ( 1 mark )**

**{ $x$ | $x$ ही संख्या 64 चे वर्गमूळ आहे. }**

उत्तर : **A = { 8, - 8 }**

**प्र. 2) { z | z हा 'Statistic' या शब्दातील अक्षर आहे. }**

उत्तर : **C = { s, t, a, i, c }**

**प्र. 3) D हा इंग्रजी महिन्यांतील 31 दिवस असणारा महिना आहे.**

उत्तर : **D = { जानेवारी, मार्च, मे, जुलै, ऑगस्ट, ऑक्टोंबर, डिसेंबर }**

**प्र. 4) A = { $x$ | $x \in W$, $x \notin N$ }**

उत्तर : **A = { 0 }**

**प्र. 5) C = { $x$ | $x$ हा जगातील समुद्र आहे. }**

उत्तर : **C = { आर्टिक समुद्र, अॅटलांटिक समुद्र, अरबी समुद्र, पॅसिफिक महासागर, दक्षिण महासागर. }**

**प्र. 6) खालील संच गुणधर्म पद्धतीने लिहा. ( 1 mark )**

**A = { 5, $5^2$, $5^3$, $5^4$, .......}**

उत्तर : **A = { z | z = $5^n$, $n \in N$, }**

**प्र. 7) T = { 1, 3, 7, 21 }**

उत्तर : **T = { $x$ | $x$ हा 21 चा अवयव आहे. }**

BUDDHIRAJ

**प्र. 8) A = { 3, 6, 9, 12, 15, 18, 21 }**

उत्तर : **A = { $x$ | $x$ = 3n, n∈N, n≤7 }**

**प्र. 9) D = { 51, 53, 55, 57, 59 }**

उत्तर : **D = { $x$ | $x$ ∈N, $x$** हा विषम पूर्णांक आहे आणि **$50 < x < 60$ }**

**प्र. 10) S = { 2, 3, 5 }**

उत्तर : **S = { y | y** ही मूळ संख्या आहे, जी **30** ची विभाजक आहे. **}**

**प्र. 11)** खालील चिन्हात दिलेली विधाने शब्दांत लिहा. **( 1 mark )**

$\frac{5}{6} \in Q$

उत्तर : $\frac{5}{6}$ हा संच **Q** चा घटक आहे.

**प्र. 12) - 3 ∉ N**

उत्तर : **- 3** हा संच **N** चा घटक नाही.

**प्र. 13) A = { R | R** ही सम संख्या आहे. **}**

उत्तर : संच **A** चे घटक **R** असे आहेत की, **R** ही विषम संख्या आहे.

- खालील संच यादी पद्धतीने लिहून त्यांचे सांत संच, अनंत संच, एक घटक संच, रिक्त संच असे वर्गीकरण करा. **( 2 mark )**

**प्र. 14) A = { $x$ | $x$** ही अशी पूर्ण संख्या आहे की, जी नैसर्गिक संख्या नाही. **}**

**[ Hint N = 1, 2, 3 ...** (नैसर्गिक संख्या) **W = 0, 1, 2 ...** (पूर्ण संख्या)**]**

उत्तर : **A = { 0 }**

**A** या संचात **'0'** एकच घटक आहे. ∴ **A** हा एकघटक संच आहे.

BUDDHIRAJ

प्र. 15) B = { y | y ही नैसर्गिक संख्या अशी आहे की, 30 < z < 36 }

उत्तर : B = { 31, 32, 33, 34, 35 }

संच B मध्ये फक्त 5 घटक आहेत. जे मोजता येतात.

∴ B हा सांत संच आहे.

प्र. 16) जर n(A) = 20, n(B) = 28 व n (A∪B) = 36 तर n(A∩ B) = ?

उत्तर : दिलेले n(A) = 20, n(B) = 28, n (A∪B) = 36 n(A∩ B) = ?

∴ n (A∪B) = n(A) + n(B) - n(A∩ B)

36 = 20 + 28 - n(A∩ B)

36 = 48 - n(A∩ B)

n(A∩ B) = 48 – 36

= 12

प्र. 17) B = { y | y < - 1, y ही पूर्णांक संख्या आहे. }

उत्तर : B = { ..., - 4, - 3, - 2 }

- 1 पेक्षा लहान संख्या पूर्णांक संख्येमध्ये अमर्याद आहेत.

∴ B हा अनंत संच आहे.

प्र. 18) खालीलपैकी कोणते संच समान आहेत व कोणते नाहीत ते सकारण लिहा. ( 2 mark )

A = { $x$ | 6$x$ - 1 = 11 }

B = { x | x ही मूळ संख्या आहे, पण विषम नाही. }

उत्तर : दिलेले, A = { $x$ | 6$x$ - 1 = 11 }

येथे, 6$x$ - 1 = 11

∴ 6$x$ = 11 + 1

∴ 6$x$ = 12

BUDDHIRAJ

$\therefore\ x = \frac{12}{6}$

$\therefore\ x = 2.$

म्हणजेच, $A = \{ 2 \}$

आता, $B = \{ x \mid x$ ही मूळ संख्या आहे, पण विषम नाही. $\}$

$\therefore\ B = \{ 2 \}$ ... ( 2 ही सममूळ संख्या आहे. )

येथे, A व B हे दोन संच समान आहेत.

$\therefore\ A = B.$

प्र. 19) $S = \{ Z \mid Z \in N, 5 < Z \leq 10 \}$

$T = \{ x \mid x$ ही विषम नैसर्गिक संख्या आहे, $x < 9 \}$

$U = \{ y \mid y$ ही सम नैसर्गिक संख्या आहे, $y < 10 \}$

उकल : $S = \{ Z \mid Z \in N, 5 < Z \leq 10 \}$

दिलेले, संच S मधील Z ही 10 किंवा 10 पेक्षा लहान पण 5 पेक्षा मोठी नैसर्गिक संख्या आहे.

$\therefore\ S = \{ 5, 6, 7, 8, 9, 10 \}$

तसेच, $T = \{ x \mid x$ ही विषम नैसर्गिक संख्या आहे, $x < 9 \}$

संच T मधील x ही 9 पेक्षा लहान विषम नैसर्गिक संख्या आहे.

$\therefore\ T = \{ 1, 3, 5, 7 \}$

आता, $U = \{ y \mid y$ ही सम नैसर्गिक संख्या आहे, $y < 10 \}$

संच U मधील y ही संख्या 10 पेक्षा लहान पण नैसर्गिक संख्या आहे.

$\therefore\ U = \{ 2, 4, 6, 8 \}$

BUDDHIRAJ

संच S, संच T व संच U मधील घटक समान नाहीत. म्हणून संच S, संच T व संच U हे समान संच नाहीत. म्हणजेच $S \neq T \neq U$.

**प्र. 20) P = { $x$ | $x$ ही 10 पेक्षा लहान विषम मूळ संख्यांचा संच आहे }**

**Q = { y | y ही संख्या आहे की, $y^2 = 81$ }**

**R = { z | z = 3n, n∈N, $n \leq 5$ }**

**S = { t | t, ही विषम संख्या आहे, $2 < x < 9$ }**

उत्तर : दिलेले,

P = { $x$ | $x$ ही 10 पेक्षा लहान विषम मूळ संख्यांचा संच आहे }

∴ P = { 3, 5, 7 }

Q = { y | y ही संख्या आहे की, $y^2 = 81$ }

∴ Q = { - 9, 9 }

R = { z | z = 3n, n∈N, $n \leq 5$ }

∴ R = { 3, 6, 9, 12, 15 }

S = { t | t, ही विषम संख्या आहे, $2 < x < 9$ }

∴ S = { 3, 5, 7 }

संच P, संच Q, संच R आणि संच S मध्ये संच P व संच S मधील घटक समान आहेत. म्हणून संच P व संच S हे समान संच आहेत.

∴ P = S.

**प्र. 21) 1 ते 30 मधील नैसर्गिक संख्यांचा विश्वसंच घेऊन A व B वेन आकृतीने दाखवा. ( 3 mark )**

**i) A = { $x$ | $x$∈N, $x$ ही मूळ संख्या आहे. }**

BUDDHIRAJ

**ii) B = { y | y∈N, y ही संयुक्त संख्या आहे. }**

**उत्तर : i) A = { *x* | *x*∈N, *x* ही मूळ संख्या आहे. }**

**A = { 2, 3, 5, 7, 11, 13, 17, 19, 23, 29 }**


**ii) B = { y | y∈N, y ही संयुक्त संख्या आहे. }**

**B = { 4, 6, 8, 9, 10, 12, 14, 15, 16, 18, 20, 21, 22, 24, 25, 26, 27, 28, 30 }**

**U = 1 ते 30 मधील नैसर्गिक संख्यांचा विश्वसंच**

**∴ U = { 1, 2, 3, 4, 5, 6, 7, .............. 30 }**

**वेन आकृती.**




**प्र. 22) संचामधील 'उपसंच - संबंध' वेन आकृतीच्या साहाय्याने दाखवा.**

**( 3 mark )**

**A = { *x* | *x* = 2n, n<5, n∈N }**

**B = { 2, 4 }**

**C = { *x* | *x* ही सम नैसर्गिक संख्या आहे, *x* ≤ 16 }**

**उत्तर : A = { *x* | *x* = 2n, n<5, n∈N }**


**∴ A = { 2, 4 }**

$B = \{ 2, 4 \}$

$C = \{ x \mid x$ ही सम नैसर्गिक संख्या आहे,

$x \leq 16 \}$

$\therefore C = \{ 2, 4, 6, 8, 10, 12, 14, 16 \}$




प्र. 23) जर $R = \{ s, t \}$ असेल तर संच R चे सर्व शक्य उपसंच लिहा. ( 2 M )

उत्तर : $\emptyset$ { s }, { t }, { s, t }

∵ प्रत्येक संच स्वतःचा उपसंच असतो.

आणि रिक्त संच हा प्रत्येक संचाचा उपसंच असतो.

प्र. 24) $E = \{ 2, 4, 6, 8, 10, 12, 14, 16, 18, 20 \}$

$F = \{ 4, 8, 12, 16, 20 \}$

$G = \{ 2, 2^2, 2^3, 2^4 \}$

$H = \{ 4^1, 4^2 \}$

वरील संचापैकी कोणता संच कोणाचा उपसंच आहे ते लिहा. (3 mark )

उत्तर : $E = \{ 2, 4, 6, 8, 10, 12, 14, 16, 18, 20 \}$

$F = \{ 4, 8, 12, 16, 20 \}$

$G = \{ 2, 2^2, 2^3, 2^4 \}$

$\therefore G = \{ 2, 4, 8, 16 \}$

$H = \{ 4^1, 4^2 \}$

$\therefore H = \{ 4, 16 \}$

वरील संच E, F, G, H वरून,

$\therefore F \subseteq E$

BUDDHIRAJ

**$G \subseteq E$**

**$H \subseteq E$**

**$H \subseteq F$**

**$H \subseteq G$**

**प्र. 25) $U = \{ x \mid x \in N$ व $4 \leq x \leq 24 \}$**

**$A = \{ y \mid y \in N$ व $6 \leq y \leq 16 \}$**

**$B = \{ z \mid z \in N$ व $18 \leq z \leq 24 \}$**

**$C = \{ m \mid m \in N$ व $6 \leq m \leq 11 \}$**

**तर $A^1$, $B^1$, $C^1$ लिहा. ( 3 mark )**

**उत्तर : $U = \{ x \mid x \in N$ व $4 \leq x \leq 24 \}$**

**$\therefore U = \{ 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24 \}$**

**$A = \{ y \mid y \in N$ व $6 \leq y \leq 16 \}$**

**$\therefore A = \{ 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16 \}$**

**$\therefore A^1 = \{ 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24 \}$**

**$B = \{ z \mid z \in N$ व $18 \leq z \leq 24 \}$**

**$\therefore B = \{ 18, 19, 20, 21, 22, 23, 24 \}$**

**$\therefore B^1 = \{ 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17 \}$**

**$C = \{ m \mid m \in N$ व $6 \leq m \leq 11 \}$**

**$\therefore C = \{ 7, 8, 9, 10 \}$**

**$\therefore C^1 = \{ 6, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24 \}$**

BUDDHIRAJ

**प्र. 26) वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचा संच विश्वसंच मानू , जर कबड्डी खेळणारे विद्यार्थी 20 % असून त्यांचा संच A आहे, तर A हा पूरक संच लिहा.**

**( 2 mark )**

उत्तर : समजा, U = वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचा संच 100% आहे

A = कबड्डी खेळणारे विद्यार्थ्यांसाठी 20 % आहेत.

A चा पूरक संच म्हणजेच $A^1$ = 100 - 20

= 80

∴ $A^1$ = वर्गातील 80 विद्यार्थी जे कबड्डी खेळत नाहीत.

**प्र. 27) खाली काही संच दिले आहेत. त्यांचा अभ्यास करताना कोणता संच त्या संचांसाठी विश्वसंच घेता येईल ? ( 3 mark )**

A = 4 च्या पटीतील संख्यांचा संच.

B = 10 च्या पाढयातील संख्यांचा संच

C = 6 च्या पटीतील संख्यांचा संच

उत्तर : संच यादी पद्धतीने लिहू.

A = { 4, 8, 12, 16, ..... }

B = { 10, 20, 30, 40, ... }

C = { 6, 12, 18, 24, ... }

आपल्याला माहित आहे,

W = { 0, 1, 2, 3, ... }

N = { 1, 2, 3, 4, ... }

I = { ...., - 3, - 2, - 1, 0, 1, 2, 3, .... }

BUDDHIRAJ

∴ संच A, संच B आणि संच C मधील घटक संख्या या नैसर्गिक संख्या (N), पूर्ण संख्या (W), पूर्णांक संख्या (I) मधील संख्या असू शकतात.

म्हणून, संच A, B, C साठी पूर्ण संख्या संच (W), नैसर्गिक संख्या संच (N) किंवा पूर्णांक संख्या संच (I) यांपैकी कोणताही संच विश्वसंच म्हणून घेता येईल.

**प्र. 28) S हा साताऱ्यातील रहिवाशांचा संच आहे.**

**M हा महाराष्ट्रातील रहिवाशांचा संच आहे.**

**A हा औरंगाबाद मधील रहिवाशांचा संच आहे.**

**B हा भारतातील रहिवाशांचा संच आहे.**

**U हा उत्तर प्रदेशातील रहिवाशांचा संच आहे.**

**i) वरील संचांपैकी कोणते संच दुसऱ्या कोणत्या संचांचे उपसंच आहेत ते लिहा.**

**ii) वरीलपैकी कोणता संच हा उदाहरणात विश्वसंच म्हणून घेता येईल. ( 4mark )**

उत्तर : i) a) साताऱ्यातील सर्व रहिवासी हे भारताचे रहिवासी आहेत.

$\therefore S \subseteq B$

b) साताऱ्यातील सर्व रहिवासी हे महाराष्ट्राचे रहिवासी आहेत.

$\therefore S \subseteq M$

c) औरंगाबाद मधील सर्व रहिवासी हे भारताचे रहिवासी आहेत.

$\therefore A \subseteq B$

d) औरंगाबाद मधील सर्व रहिवासी हे महाराष्ट्राचे रहिवासी आहेत.

$\therefore A \subseteq M$

e) उत्तर प्रदेशातील सर्व रहिवासी हे भारताचे रहिवासी आहेत.

$\therefore U \subseteq B$

BUDDHIRAJ

**f)** महाराष्ट्रातील सर्व रहिवासी हे भारताचे रहिवासी आहेत.

$\therefore$ **M ⊆ B**

**ii)** सातारा, औरंगाबाद, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र हे सर्व भारताचे घटक आहेत.

$\therefore$ **B** हा विश्वसंच म्हणून घेता येईल.

प्र. **29) A = { 1, 4, 9, 10, 11 }, B = { 9, 10, 11, 12 }, C = { 9, 10 },**

**D = {1, 8 }** तर पुढीलपैकी कोणती विधाने सत्य व कोणती विधाने असत्य आहेत ते

लिहा. **( 4 mark )**

**i) A ⊆ B    ii) B ⊆ C    iii) C ⊆ B    iv) D ⊆ A    v) A ⊆ D.**

उत्तर : दिलेले, **A { 1, 4, 9, 10, 11 }**

**B = { 9, 10, 11, 12 }**

**C = { 9, 10 }**

**D = { 1, 9 }**

**i) A ⊆ B** - हे विधान असत्य आहे.

**ii) B ⊆ C** - हे विधान असत्य आहे.

**iii) C ⊆ B** - हे विधान सत्य आहे.

**iv) D ⊆ A** - हे विधान सत्य आहे.

**v) A ⊆ D** - हे विधान असत्य आहे.

प्र. **30) A = { 2, 4, 6, 8 }, B = { 3, 6, 9, 12 }** तर **A ∩ B = ?**

वेन आकृतीने दाखवा. **( 3 mark )**

उत्तर : दिलेले, **A = { 2, 4, 6, 8 },**


**B = { 3, 6, 9, 12 }**

BUDDHIRAJ

$\therefore$ A ∩ B = { 6 }

[ ∵ A आणि B या दोन्ही संचांतील 6 हा सामाईक घटक आहे. ]

वेन आकृती -




प्र. 31) X = { *x* | *x* ही 60 व 90 यांच्या दरम्यानची मूळसंख्या आहे.

X = ______________________________

Y = ______________________________

Y = { 71, 73, 75, 77, 79, 81, 83, 85, 87, 89 }

तर X ∩ Y = __________

वरील कृती पूर्ण करा. संचांचा छेद संच वेन आकृतीने दाखवा. ( 3 mark )

उत्तर : X = { *x* | *x* ही 60 व 90 यांच्या दरम्यानची मूळसंख्या आहे.


X = { 61, 67, 71, 73, 79 }

Y = { y | y ही 70 व 90 मधील विषम संख्या आहे. }

Y = { 71, 73, 75, 77, 79, 81, 83, 85, 87, 89 }

तर X ∩ Y = { 71, 73, 79 }

वेन आकृती -




BUDDHIRAJ

प्र. 32) S = { a, b, c, d, e, f } T = { c, d, e, f }

तर S ∩ T = _________ ?

परंतु T = _______

∴ S ∩ T = T

येथे T हा S चा उपसंच आहे.

∴ जर ________ तर _________

तसेच जर S ∩ T = _____ तर T ⊆ S.

वरील कृती पूर्ण करा. ( 3 mark )

उत्तर : S = { a, b, c, d, e, f }

T = { c, d, e, f }

तर S ∩ T = { c, d, e, f }

परंतु T = { c, d, e, f }


∴ S ∩ T = T

येथे T हा S चा उपसंच आहे.

∴ जर T ⊆ S तर S ∩ T = T

तसेच जर S ∩ T = T तर T ⊆ S.

प्र. 33) खाली दिलेल्या वेनआकृतीवरून दोन संचांचा छेदसंच लिहा. (3 mark )




BUDDHIRAJ

उत्तर : वरील वेनचित्रावरून संच A आणि संच B मध्ये 2 व 8 हे दोन घटक सामाईक आहेत.

∴ A ∩ B = { 2, 8 }


तसेच संच A व C मध्ये 9 व 5 हे दोन घटक सामाईक आहेत.

∴ A ∩ C = { 5, 9 }

परंतु संच B व C मध्ये एकही घटक सामाईक नाही.

∴ B ∩ C = { } किंवा B ∩ C = ∅.

प्र. 34) येथे P, Q, R हे संच वेन आकृत्यांनी दाखवले आहेत. त्यांपैकी कोणते दोन संच विभिन्न आहेत ते लिहा. ( 2 mark )




उत्तर : येथे P = { 3, 6, 9, 12, 15 }

Q = { 4, 8, 12, 16 }

R = { 2, 5, 7 }

∴ संच P व R मध्ये एकही सामाईक घटक नाही.

∴ P व R हे विभिन्न संच आहेत.

प्र. 35) समजा, इंग्रजी अक्षरांचा संच हा विश्वसंच आहे तसेच संचाचे घटक इंग्रजी अक्षरे आहेत. A हा SMILE या शब्दातील अक्षरांचा एक संच आहे.

BUCHIRAJ

**B हा TRY या शब्दातील अक्षरांचा दुसरा संच आहे. तर हे संच विभिन्न आहेत का ते पडताळा व दोन संचांचा छेद काय येतो ते लिहा. वेनआकृती दाखवा. ( 3 mark )**

उत्तर : **A = { S, M, I, L, E }**


**B = { T, R, Y }**

वरील दोन्ही संचात एकही सामाईक घटक नाही.

∴ **A** व **B** हे विभिन्न संच आहेत.

∴ $A \cap B = \emptyset$

संच **A** व **B** मध्ये एकही सामाईक घटक नाही. म्हणून या दोन्ही संचांचा छेद रिक्त येतो.





**प्र. 36) A = { 22, 26, 28, 30 }, B = { 22, 23, 25, 27 }**

**तर $A \cup B$ =? वेन आकृती दाखवा. (2 mark )**

उत्तर : **A = { 22, 26, 28, 30 }**

**B = { 22, 23, 25, 27 }**

∴ $A \cup B$ = **{ 22, 23, 25, 26, 27, 28, 30 }**



प्र. 37) $X = \{ x \mid x$ ही पूर्णांक संख्या आहे. $0 > x \geq -5 \}$

$X =$ ____________________________?

$Y =$ ____________________________?

$Y = \{ 0, 1, 2, 3, 4, 5 \}$

तर $X \cup Y =$ ___________

वरील कृती पूर्ण करा. ( 3 mark )

उत्तर : $X = \{ x \mid x$ ही पूर्णांक संख्या आहे. $0 > x \geq -5 \}$


$X = \{ -5, -4, -3, -2, -1 \}$

$Y = \{ y \mid y$ ही पूर्ण संख्या आहे. $0 \leq x \leq 5 \}$

$Y = \{ 0, 1, 2, 3, 4, 5 \}$

तर $X \cup Y = \{ -5, -4, -3, -2, -1, 0, 1, 2, 3, 4, 5 \}$

प्र. 38)




$A =$ _________________?

$B =$ _________________?

$\therefore A \cup B =$ ___________?

संच A आणि संच $A \cup B$ मध्ये नेमके तेच घटक आहेत.

यावरून, जर $B \subseteq A$ तर ___________? ( 3 mark )

BUDHIRAJ

उत्तर : A = { 2, 4, 6, 8, 10 }


B = { 4, 6 }

∴ A ∪ B = { 2, 4, 6, 8, 10 }

संच A आणि संच A ∪ B मध्ये नेमके तेच घटक आहेत.

यावरून, जर B ⊆ A rj A ∪ B = A.

**प्र. 39) खाली दिलेल्या वेन आकृतीवरून दोन संचांचा संयोग संच लिहा. ( 3 M)**




उत्तर : R ∪ S = R व S संचांतील सर्व घटक एकत्रित करून तयार होणारा संच :


R ∪ S = { 51, 57, 67, 53, 69, 59, 65, 61 }

S ∪ T = S व T संचांतील सर्व घटक एकत्रित करून तयार होणारा संच : S ∪ T = { 59, 53, 69, 65, 61, 55, 63 }

R ∪ T = R व T संचांतील सर्व घटक एकत्रित करून तयार होणारा संच : R ∪ T = { 51, 57, 67, 53, 69, 55, 63, 61 }

**प्र. 40) वेन आकृतीत दर्शविलेल्या संचांवरून खालील संच यादी पद्धतीने लिहा. (4 mark )**

**i) U ii) A iii) B iv) A ∪ B v) A ∩ B.**




BUDDHIRAJ

उत्तर : i) U = { 4, 8, 12, 16, 3, 13, 7, 10 }

ii) A = { 4, 8, 12, 16 }

iii) B = { 3, 8, 13 }

iv) A ∪ B = { 3, 4, 8, 12, 13, 16 }

v) A ∩ B = { 8 }.

प्र. 41) 20 ते 35 मधील सर्व संख्या ही विश्वसंच आहे. त्यामध्ये A हा 21 ते 35 मधील मूळ संख्यांचा एक संच आहे. B हा 20 ते 30 मधील विषम संख्यांचा दुसरा संच आहे. तर,

i) U, ii) A, iii) B, iv) A ∪ B, v) A ∩ B काढा.

हे सर्व वेन आकृतीच्या साहाय्याने दाखवा. ( 1 mark each )

उत्तर : U = 20 ते 35 मधील सर्व संख्या :

i) U = { 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34 }

A = 21 ते 35 मधील सर्व मूळ संख्या :


ii) A = { 23, 29, 31 }

B = 20 ते 30 मधील सर्व विषम संख्या :

iii) B = { 21, 23, 25, 27, 29 }


iv) A ∪ B = { 21, 23, 25, 27, 29, 31 }

v) A ∩ B = { 23, 29 }



**प्र. 42) वेन आकृतीत दर्शवलेल्या संचांवरून खालील संच यादी पद्धतीने लिहा. . ( 1 mark each )**

**i) U   ii) $A'$   iii) $B'$   iv) $(A \cup B)'$   v) $(A \cap B)'$**




उत्तर : **i) U = { a, b, c, d, e, f, g, h, i, j, k }**

**A = { a, b, c, d, e }**

**ii ) $A'$ = { f, g, h, i, j, k }**

**B = { f, g, h, d, e }**

**iii) $B'$ = { a, b, c, i, j, k }**

**$A \cup B$ = { a, b, c, d, e, f, g, h }**

**iv) $(A \cup B)'$ = { i, j, k }**

**$A \cap B$ = { d, e }**

**v) $(A \cap B)'$ = { a, b, c, f, g, h, i, j, k }**

**प्र. 43) जर U = { 2, 3, 5, 7, 11, 13, 17, 19, 23 } आणि A = { 2 } तर $A^1$ लिहा आणि B = { 3, 5, 7 } तर $B^1$ लिहा. वेन चित्राने स्पष्ट करा.** ( 3 M)

उत्तर : **U = { 2, 3, 5, 7, 11, 13, 17, 19, 23 }**

**A = { 2 }**

**∴ $A^1$ = { 3, 5, 7, 11, 13, 17, 19, 23 }**

**B = { 3, 5, 7 }**

**∴ $B^1$ = { 2, 11, 13, 17, 19, 23 }**

BUDDHIRAJ

**प्र. 44) A = { 10, 20, 30, 40 }, B = { 20, 40, 60, 80, 100 } तर**

**n (A∪B) = n (A) + n (B) - n (A∩B) या नियमाचा पडताळा घ्या. .**

**(5 mark )**

उत्तर : दिलेले, **A = { 10, 20, 30, 40 }**

**A या संचात 10, 20, 30, 40 असे 4 घटक आहेत.**

**∴ n (A) = 4 ... (1)**

**B = { 20, 40, 60, 80, 100 }**

**संच B मध्ये 5 घटक आहेत.**

**∴ n (B) = 5 ... (2)**

आता, **(A∪B) = { 10, 20, 30, 40, 60, 80, 100 }**

**∴ n (A∪B) = 7 ... (3)**

तसेच, **(A∩B) = { 20, 40 }**

**∴ n (A∩B) = 2 ... (4)**

**∴ n (A∪B) = n (A) + n (B) - n (A∩B)**

**7 = 4 + 5 - 2 ... (1, 2, 3, 4 वरून )**


**7 = 9 - 2**


**7 = 7**

∴ डावी बाजू = उजवी बाजू.

**∴ n (A∪B) = n (A) + n (B) - n (A∩B).**

BUDDHIRAJ



प्र. 45) जर n (A) = 17, n (B) = 23, n (A∩B) = 2 तर n (A∪B) शोधा.

. ( 2 mark )

उत्तर : दिलेले, n (A) = 17, n (B) = 23, n (A∩B) = 2,

n (A∪B) = ?

∴ n (A∪B) = n (A) + n (B) - n (A∩B).

n (A∪B) = 17 + 23 - 2

n (A∪B) = 40 - 2

∴ n (A∪B) = 38.

प्र. 46) जर n (S∪T) = 29, n (S) = 15, n (S∩T) = 12 तर n (T) = ?

(2 mark )

उत्तर : आपल्याला माहित आहे,

n (S∪T) = 29, n (S) = 15, n (S∩T) = 12, n (T) = ?

∴ 29 = 15 + n (T) - 12

∴ 29 = 15 - 12 + n (T)

∴ 29 = 3 + n (T)

∴ 29 - 3 = n (T)

∴ n(T) = 26.

प्र. 47) जर n (A) = 27, n (B) = 33, n (A∪B) = 48 तर n (A∩B) काढा. (2 mark )

उत्तर : दिलेले, n (A) = 27, n (B) = 33, n (A∪B) = 48,

n (A∩B) = ?

BUDDHIRAJ

आपल्याला माहित आहे,

**$n(A \cup B) = n(A) + n(B) - n(A \cap B)$**

**$48 = 27 + 33 - n(A \cap B)$**

**$48 = 60 - n(A \cap B)$**

**$\therefore n(A \cap B) = 60 - 48$**

**$\therefore n(A \cap B) = 12.$**

**प्र. 48)** एका स्पर्धा परीक्षेला **60** विद्यार्थी गणितात उत्तीर्ण झाले. **70** मराठी विषयात उत्तीर्ण झाले. **50** विद्यार्थी दोन्ही विषयात उत्तीर्ण झाले. एकही विद्यार्थी दोन्ही विषयात अनुत्तीर्ण झाला नाही तर एकूण विद्यार्थी किती होते ?

**(4 mark )**

उत्तर : गणित विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा संच **A** मानू.

**$\therefore n(A) = 60.$**

मराठी विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा संच **B** मानू.

**$\therefore n(B) = 70.$**

दोन्ही विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा संच **$(A \cap B)$,**

**$\therefore n(A \cap B) = 50$**

एकही विद्यार्थी दोन्ही विषयात अनुत्तीर्ण झाला नाही. ... (दिलेले आहे.)

एकूण विद्यार्थ्यांचा संच = **$(A \cup B)$**

आपल्याला माहित आहे,

**$n(A \cup B) = n(A) + n(B) - n(A \cap B)$**

**$n(A \cup B) = 60 + 70 - 50$**

**$n(A \cup B) = 130 - 50$**

BUDDHIRAJ

**n (A∪B) = 80**

∴ एकूण विद्यार्थ्यांची संख्या = **80.**

**प्र. 49) एका शाळेच्या वसतिगृहात 200 विद्यार्थी आहेत. त्यांपैकी 120 विद्यार्थी कॉफी पितात, 100 विद्यार्थी चहा पितात. ही दोन्ही पेये पिणारे किती विद्यार्थी आहेत ते ठरवा. (4 mark )**

उत्तर : समजा **P** कॉफी पिणाऱ्या विद्यार्थ्यांचा संच

∴ **n (P) = 120.**

**Q** चहा पिणाऱ्या विद्यार्थ्यांचा संच

∴ **n (Q) = 100.**

दोन्ही पेये पिणाऱ्या विद्यार्थ्यांचा संच **P ∩ Q**

∴ **n (P ∩ Q) = ?**

दोघांपैकी किमान एकतरी पेय घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा संच **P ∪ Q**

∴ **n (P ∪ Q) = 200.**

सूत्रावरून,

**n (P ∪ Q) = n (P) + n (Q) - n (P ∩ Q)**

∴ **200 = 120 + 100 - n (P ∩ Q)**

∴ **200 = 220 - n (P ∩ Q)**

∴ **n (P ∩ Q) = 220 - 200**

∴ **n (P ∩ Q) = 20**

∴ दोन्ही पेय पिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या = **20.**

BUDDHIRAJ

प्र. 50) 50 विद्यार्थ्यांचा वर्गात, 35 विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र आवडते, 30 विद्यार्थ्यांना गणित आवडते आणि 3 विद्यार्थ्यांना काहीच आवडत नाही. यातील किती जणांना दोन्ही विषय आवडतात आणि किती जणांना फक्त भौतिकशास्त्र आवडते ? (4 mark )

उत्तर : वर्गातील एकूण विद्यार्थी = 50

भौतिकशास्त्र आवडणाऱ्या 35 विद्यार्थ्यांचा संच A मानू.

$\therefore n(A) = 35$

गणित आवडणाऱ्या 30 विद्यार्थ्यांचा संच B मानू,

$\therefore n(B) = 30$

भौतिकशास्त्र किंवा गणित आवडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या म्हणजेच $n(A \cup B)$

$\therefore n(A \cup B) = 50$

3 विद्यार्थ्यांना काहीच आवडत नाही.

भौतिकशास्त्र आणि गणित हे दोन्ही विषय आवडणाऱ्या मुलांची संख्या

$= n(A \cap B)$

आपल्याला माहित आहे,

$n(A \cup B) = n(A) + n(B) - n(A \cap B)$

$50 = 35 + 30 - n(A \cap B)$

$50 = 65 - n(A \cap B)$

$n(A \cap B) = 65 - 50$

$n(A \cap B) = 15$

3 विद्यार्थ्यांना काहीच आवडत नाही. ... (दिलेले आहे.)

$\therefore 15 + 3 = 18$

$\therefore$ दोन्ही विषय आवडणारी मुले = 18

तसेच भौतिकशास्त्र आवडणारी मुले = 35 ... (दिलेले आहे.)

व दोन्ही विषय आवडणारी मुले = 18


$\therefore 35 - 18 = 17$

यावरून, 17 विद्यार्थ्यांना फक्त भौतिकशास्त्र हा विषय आवडतो. आणि 18 विद्यार्थ्यांना दोन्ही विषय आवडतात.

BUDHIRAJ

**प्र. 51) शेजारील वेन आकृतीत U, A, B, (A ∪ B) आणि (A ∩ B) हे संच लिहा.**

**(4 mark )**




**उत्तर : U = { 2, 3, 1, 10, 7, 5, 8, 9, 11, 13, 4 }**

**A = { 2, 3, 1, 7, 5}**

**B = { 1, 10, 5, 8, 9}**

**(A ∩ B) = { 1, 5}**

**(A ∪ B) = { 1, 2, 3, 5, 7, 8, 9, 10}**

*****************

BUDDHIRAJ